भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७६९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/११/२०१६

**१) अज्ञात मोटार सायकलच्या निष्काळजीपणामुळे एक जखमी . :–**

दिनांक १९/११/२०१६ रोजी १०.३० ते १०.४५ वा. दर. यातील फिर्यादी धिरज पुरुषोत्तम नंदनवार वय २३ वर्ष, रा. इंदीरा वार्ड वरठी हा मोटार सायकल क्र. सि.जी. ०४/झेड. बी. ६६९९ चा चालक हे देहेगाव वरुन वरठी रेल्वे स्टेशन येथे पाहुणे यांना सोडण्यास जात असतांना नेहरु वार्ड वरठी डांबरी रोड वर समोरुन येणा–या यातील अज्ञात आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मोटार सायकलला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. :–**

दिनांक २३/११/२०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील फिर्यादी अनमोल प्रल्हाद जांभुळकर वय ३८ वर्ष, रा. एकोडी हा आपल्या घरी हजर असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे घरासमोर रोडवर जावुन तुझ्या भाश्याने माझे मुलीसोबत प्रेम विवाह केला असे म्हणुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) दारूडया वाहन चालकावर कारवाई. :–**

दिनांक २३/११/०१६ रोजी १३.४५ वा. दरम्यान आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३४ एडी ९५० च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत राजीव गांधी चौक भंडारा येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल अनॉलायझर रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोना. साबळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक २३/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ७५ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०५ केसेस अवैध प्रवासी ०१ व ईतर वाहनांवरती ६९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

24/11/2016

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९५५२५६५८५२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द, करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.